# रक्तवाहिन्या फोडणारा आजार (ॲन्युरिझम) आणि त्यावरील होमिओपॅथिक उपचार

हा एक रक्तवाहिन्यांचा आजार आहे. ज्यामध्ये रक्तवाहिन्यांच्या भिंतीला रक्ताने भरलेल्या फुग्यासारख्या फुगवटा येतो. असा फुगवटा शरीरातील कुठल्याही रक्तवाहिनीला येऊ शकतो. हा फुगवटा निर्माण होण्याची एकाहून अनेक कारणे असतात. रक्तवाहिन्यांच्या भिंतीतील दोष किंवा वाहणाऱ्या रक्तातील दोषामुळे असा फुगवटा निर्माण होऊ शकतो. हा आजार पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये जास्त प्रमाणात दिसून येतो. साधारणतः वयाच्या ४० ते ५० च्या दरम्यान हा आजार उद्भवतो. जसा जसा हा फुगवटा फुगत जातो, तसा तसा तो फुटण्याची संभावना वाढत जाते. या फुटलेल्या फुगवट्यामुळे रक्तस्राव होऊन रुग्ण शॉकमध्ये जातो आणि मृत्यू ओढावतो. रक्तवाहिन्यांच्या भिंतीमधील दोषामुळे रक्ताची गुठळी होऊन ती शरीरातील महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा खंडित करून त्या अवयवांचे कार्य विस्कळीत करू शकते.

रक्तातील चरबीच्या गुठळीमुळे रक्तवाहिन्यांच्या आतल्या स्थराला जखमा होऊन या भिंतीतील पेशींचा ऱ्हास होऊन तेथे फुगवटा निर्माण होतो. त्यातच उच्चरक्तदाबामुळे कमकुवत झालेल्या रक्तवाहिनीच्या भागातील फुगवटा धमनीतील अतिदाबामुळे फुगत जातो. असाच फुगवटा जंतुसंसर्गामुळे पोट, मांडी, मान व पाय इ. धमन्यांमध्ये होऊ शकतो व फुटल्यानंतर संपूर्ण रक्तात पू पसरतो.

**वर्गीकरण :-** हा फुगवटा धमनी तसेच रोहिणींमध्ये ही दिसून येतो. या आजाराचे वर्गीकरण कुठल्या ठिकाणी झाला आहे त्यावरून तसेच फुगवट्याच्या आकारावरून केला जातो. अन्युरिझममध्ये धमनीच्या बाह्य, मध्यस्थ व अंतःस्थ अशा भिंतींना एकत्रितरीत्या फुगवटा येतो. याचे कारण चरबीची कुठळी, सिफिलिस किंवा जन्मतःच रक्तवाहिन्यांतील दोष हे असू शकते. कधी कधी हार्ट ॲटॅक येऊन गेल्यानंतर हृदयाच्या निलय भागाला असा फुगवटा येतो.

ॲन्युरिझम हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमध्ये, निलय भागाला किंवा हृदयाच्या शस्त्रक्रियेनंतरही होऊ शकतो. छातीच्या भागातील महाधमनी तसेच पोटातील महाधमनीला असा फुगवटा येतो.

मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या धमनीमध्ये, किडनीला, पायातील धमनीमध्येही होऊ शकतो.

**लक्षणे :-** या आजाराची लक्षणे व चिन्हे कुठल्या भागातील रक्तवाहिनीला फुगवटा झाला आहे त्यावर अवलंबून असतात. हा फुगवटा फुटेस्तोपर्यंत कधी कधी कुठलीच लक्षणे दिसून येत नाहीत किंवा कधी कधी तपासणीच्या वेळी अचानक दिसून येतो.

**मेंदूतील ॲन्युरिझम** - न फुटलेल्या मेंदूतील ॲन्युरिझममध्ये अशक्तपणा, शरीराचा तोल जाणे, आकलनक्षमता कमी होणे, बोलण्यात व दिसण्यात त्रुटी निर्माण होणे इ. लक्षणे दिसून येतात. फुटलेल्या मेंदूतील फुगवट्यामुळे मेंदूमध्ये रक्तस्राव होऊन जास्त प्रमाणात डोके अचानक दुखू लागणे, मान आखडणे, अचानक न दिसणे, आकडी येणे, लकवा मारणे इ. लक्षणे दिसून येतात.

पोटातील रक्तवाहिन्यांचा फुगवटा यामुळे पाठ दुखणे, उलट्या होणे, शरीरांतर्गत रोहिन्यांमध्ये रक्ताची गुठळी होऊन या रोहिन्या फुगतात. जास्त करून पायांच्या रोहिन्यांमध्ये हा त्रास उद्भवतो. ज्यामुळे ही गुठळी अचानक पायातून सुटून फुफ्फुसांचा रक्तपुरवठा विस्कळीत करून श्वासोच्छ्वासाला अटकाव करून अचानक आणीबाणीचा प्रसंग उद्भवतो. किडनीतील रक्तवाहिन्यांच्या फुगवट्यामुळे उच्चरक्तदाब, पाठ दुखणे, लघवीवाटे रक्त जाणे, शक्तिपातजन्य स्थिती निर्माण होते.



होमिओपॅथी चिकित्सा व उपचार
डॉ. अमरसिंह निकम

**कारणे :-** या आजाराला कारणीभूत ठरू शकणारे धोक्याचे घटक म्हणजे मधुमेह, लठ्ठपणा, उच्चरक्तदाब, तंबाखूचे सेवन, रक्तातील चरबीचे प्रमाण जास्त असणे आणि कॉपरचे प्रमाण कमी असणे तसेच सिफिलिस, क्षयरोगासारखे आजार व जन्मतः रक्तवाहिन्यांमधील विकृती इ.

**निदान :-** या आजाराचे निदान मेंदूचा सी. टी. स्कॅन व ॲन्जीओग्रॅमद्वारे होते.

**केस** - ही एका ३७ वर्षे महिलेची केस आहे. जिला दीड वर्षांपूर्वी अचानक डोके दुखून अशक्तपणा जाणवू लागला. चालताना तोल जाऊ लागला. तिच्या अवतीभोवती काय घडत आहे हेदेखील तिला समजत नव्हते. सततच्या दुखण्यामुळे डॉक्टरांनी मेंदूचा सी.टी. स्कॅन करण्यास सांगितले आणि त्यामध्ये डाव्या मेंदूच्या रक्तवाहिनीला मोठा फुगवटा निर्माण झाल्याचे आढळून आले. त्याचबरोबर अंतस्थ मस्तिष्कामध्ये रक्तस्राव होऊन मेंदूला सूज येऊन त्याचा दबाव मेंदूच्या आतील महत्त्वाच्या भागांना होत असल्याचे दिसून आले. आजाराचे गंभीर स्वरूप लक्षात घेता डॉक्टरांनी तिला जिवाला धोका निर्माण करू शकणारी रक्तवाहिनीची शस्त्रक्रिया करण्यास सांगितली. ऑपरेशन धोकादायक असल्या कारणाने रुग्ण माझ्याकडे होमिओपॅथिक औषधांसाठी आला.

**तक्रारी :-** १. अशक्तपणा २ महिन्यांपासून - थोड्याशाही शारीरिक श्रमानंतर थकवा जाणवणे. आजूबाजूच्या गोष्टींविशयी सजगता कमी होऊन रुग्ण दिवसभर एकाच रूममध्ये बसून राहत असे.

**२. सतत डोके दुखणे, चक्कर येणे** - डोक्यामध्ये सतत वेगवेगळ्या ठिकाणी जडपणा जाणवणे. रक्तप्रवाह होत असल्यासारखे चेहऱ्यावर जाणवणे. थोड्याशाही आवाजानंतर, तणावामुळे, उन्हामुळे तक्रारींमध्ये वाढ होणे.

**३. नाकाच्या आत सतत जखमा होणे** - अचानक नाकाच्या जखमा होऊन खपल्या होणे. त्या ठिकाणी थोड्याशा धक्क्यानेही वेदना होणे.

**विशेष माहिती :-** १. खाण्यात तिखट पदार्थांची आवड. २. तहान जास्त प्रमाणात लागणे. ३. जिभेवर घट्ट आवरण. ४. मिश्र प्रकृती.

**स्वभाव :-** तुमच्या लहानपणाविषयी सांगा.

माझं लहानपण एका खेडेगावात गेले. मला एक लहान भाऊ आहे. माझा स्वभाव लहानपणी खूप चिडचिडा होता. मला कोणी काही काम सांगितले तर लगेच राग यायचा. रागामध्ये कधी कधी शिवीगाळ होत असे. लहान भावाने माझे काही ऐकले नाही तर मी लगेच चिडत असे.

**तुमचा स्वभाव कसा आहे?**

मला पटकन राग येतो. मी माध्यमिक शाळेमध्ये शिक्षिका म्हणून काम करते. मुलांनी माझं ऐकलं नाही तर मी ओरडते, मारते. आमचं एकत्र कुटुंब आहे. कोणी माझ्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला तर ते मला सहन होत नाही. मला जिथल्या तिथे गोष्टींना प्रत्युत्तर करण्याची सवय आहे.

**तुमच्या आयुष्यातील ताणतणावाचा प्रसंग कोणता?**

मला लग्नानंतर हव्या तशा गोष्टी माझ्या मनाप्रमाणे करायला मिळाल्या नाहीत. आमची आर्थिक परिस्थिती मिस्टरांची परमनंट नोकरी नसल्यामुळे व्यवस्थित नाही. याचाही मला ताण येत असतो. माझे वडील माझ्या वयाच्या १८ व्या वर्षी अचानक अपघातात वारले. दुसऱ्या व्यक्तीच्या चुकीमुळे हा अपघात झाला. या घटनेचा मला खूप राग आला होता. तेव्हापासून मी देवावर विश्वास ठेवणे सोडून दिले. सध्या आजारी पडल्यापासून माझी सतत चिडचिड होत आहे.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व :-** १. रागिष्ठ स्वभाव २. अन्याय सहन न होणे ३. अपशब्द वापरण्याची वृत्ती ४. तडफदार स्वभाव ५. रात्रीच्या वेळी वेदना होणे. ६. रक्तवाहिन्यांना फुगवटा येणे. ७. तिखट पदार्थांची आवड. ८. चालताना तोल जाणे. ९. तहान खूप प्रमाणात लागणे. १०. मिश्र प्रकृती.

**प्रतिसाद :-** आजाराची गंभीरता लक्षात घेऊन मी त्यांना माझ्या रुग्णालयात भरती करून होमिओपॅथिक औषध सुरू केले. साधारणतः दोन आठवड्यांतच त्यांचा डोक्यातील जडपणा, बधीरपणा कमी झाला. हळूहळू शरीराचा तोल जाणे बंद झाले. रुग्ण सगळ्यांशी व्यवस्थित बोलू लागला. डिस्चार्ज घेऊन मी त्यांना पुन्हा १५-१५ दिवसांनी फेरतपासणीसाठी बोलावले. घरी जाऊन त्या दैनंदिन कामे उत्साहाने करू लागल्या. तीन महिन्यांनी मी त्यांना पुन्हा मेंदूचा सी.टी. स्कॅन करण्यास सांगितले. त्यामध्ये रक्तवाहिनींत फुगवटा नसल्याचे आढळून आले.

आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल,
हनुमान मंदिराजवळ, स/नं. ३०९/१/२, शिवाजी चौक, पिंपरी गाव, पुणे -१७
फोन नंबर - ०२०-२७४१२१९७/२७४१२५४९

## संक्षिप्त

### कात्रज डेअरी एक्सपो २०१५ चे आयोजन

**। पुणे : प्रतिनिधी**

माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघातर्फे दूध उत्पादक व शेतकऱ्यांना दूध व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टीने दि. १२ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०१५ या कालावधीत कात्रज डेअरी एक्सपो २०१५ चे आयोजन केले आहे. याबरोबरच यशस्वीनी सामाजिक अभियान यांच्यातर्फे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे महाराष्ट्राची खरेदी जत्रा आणि विविध विषयांवरील चर्चासत्रे होणार आहेत. शरद पवार यांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या चरित्रावरील माहिती व छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात येणार आहे.

# खासगी रुग्णालये माफिया स्टाइलने वागत आहेत : माननीयांना झाला साक्षात्कार!

**। पुणे : प्रतिनिधी**

पालिकेकडून जादा जागा, सेवासुविधा घेणारी खासगी रुग्णालये ही माफिया पद्धतीने नागरिकांकडून पैसे वसूल करीत असल्याचा साक्षात्कार सोमवारी पालिकेतील नगरसेवकांना झाला. गरिबांची मोफत बेड ही रुग्णालये पैसे कमविण्यासाठी वापरत असल्याचा आरोप यावेळी केला. त्यांनी यावेळी पुण्यात गरीब माणसे राहत नाहीत हे सांगून पुण्यातील आर्थिक सुबत्ता आता वाढली असल्याचेही नमूद केले. सभेच्या अध्यक्षस्थानी महापौर दत्ता धनकवडे होते.

मस्तवाल झालेली खासगी रुग्णालये आपल्या शिफारशींना जुमानत नाहीत हे लक्षात आल्यानंतर आता कारवाईसाठी या नगरसेवकांनी पालिकेत साकडे घातले आहे. पालिकेची रुग्णालये सक्षम करण्याची गरज असल्याचे यावेळी डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी सांगितले. खासगी रुग्णालयाबरोबर झालेले करारनामे सापडत नाही. पालिकेकडून पत्र घेऊन जाणाऱ्या नागरिकांना बेड शिल्लक नाही, असे सांगून खासगी रुग्णालये पळवाट काढीत आहेत, असेही यावेळी नमूद करण्यात आले. फ्री बेडबाबत खासगी रुग्णालये पालिकेला ठेंगा दाखवत असल्याचे यापूर्वीही लक्षात आले असताना नगरसेवकांनी याचा पुन्हा पुन्हा उच्चार सभेत केला.

सुभाष जगताप, प्रशांत जगताप, बापुराव कर्णेगुरुजी, सतीश म्हस्के, वनिता वागस्कर, योगेश मुळीक, सचिन भगत यांच्यासह अनेक नगरसेवकांनी आरोग्यसेवेचा मुद्दा उपस्थित करीत प्रशासनावर हल्लाबोल केला. ॲड. अभय छाजेड यांनी आरोग्यसेवा महाग होत असताना पालिकेची यंत्रणा सक्षम करण्यासाठी एखादा कृती आराखडा तयार करण्याची मागणी केली.

आरोग्य विभागसुद्धा खासगी रुग्णालयांच्या दावणीला बांधला गेला आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी हजारो नागरिक मोफत उपचारापासून वंचित राहत असल्याचा आरोप सर्वपक्षीय नगरसेवकांनी सोमवारी सर्वसाधारण सभेत केला. पालिकेने स्वतःचे मेडिकल कॉलेज आणि जेनरिक मेडिकल सुरू कराव्यात, अशी मागणीदेखील यावेळी करण्यात आली. महापालिका प्रशासन सर्व आरोग्य सुविधांची माहिती नगरसेवकांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

शहरातील खासगी रुग्णालयांकडून वाढीव एफएसआयच्या बदल्यात नागरिकांना मोफत बेड देणे बंधनकारक आहे. आरोग्य विभागाच्या संगनमताने मात्र या सुविधाच नागरिकांपर्यंत पोहोचत नाही. याविषयी नगरसेवक अनिवाश बागवे यांनी सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केला. यामुळे सभागृहात महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या कारभाराचे वाभाडे नगरसेवकांनी काढले.

### सभागृहनेत्याचा आरोप

*आरोग्य विभाग आणि खासगी हॉस्पिटलकडून पुणेकरांची फसवणूक केली जात आहे. हॉस्पिटलमध्ये फ्री बेडची सुविधा असताना ते दिले जात नाहीत. मुळात पुणेकरांना ही योजनाच माहीत नाही. लाखो रुग्ण औषध आणि उपचारापासून वंचित आहेत. मुळात फ्री बेड मोकळेच ठेवले जात नाहीत. त्यांना आरोग्य विभागाचे अभय आहे. त्यामुळे ही हॉस्पिटल चोर असल्याचा आरोप सभागृहनेते बंडू केमसे यांनी केला. खासगी हॉस्पिटलचे मालक अधिकाऱ्यांची भेट घेऊन संगनमत करीत असल्याचेही केमसे म्हणाले.*

## आपलं व्यासपीठ

### सुखसागरनगर परिसरात वीजेची समस्या

सुखसागरनगर परिसरात अनेकवेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत असून त्यामुळे महावितरणविरोधात नाराजीचा सुर उमटत आहे. गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात ही समस्या गंभीर होत आहे. रात्री अपरात्री तसेच दिवसाही अनेकवेळा वीजपुरवठा खंडीत होत आहे. रात्रीच्यावेळी वीजपुरवठा खंडित झाल्यास चोरी व इतर गुन्हे घडण्याचे प्रमाण वाढत आहे. या परिसरात फुरसुंगी सब स्टेशन, पद्मावती व कात्रज या तीन सबस्टेशनमधून पुरवठा होत आहे. मात्र महावितरणशी संपर्क साधला असता त्यांच्याकडून वीज पुरवठा सुरळीत होईल असे ठरलेले उत्तर दिले जाते मात्र वीजपुरवठा कधी सुरळीत होईल याचा नेम नसतो त्यामुळे महावितरणच्या प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देवून नागरिकांच्या या समस्येचा सहानुभूतीने विचार करावा अशी मागणी सुखसागरनगर वासियांकडून होऊ लागली आहे. शहरातील इतर परिसरात मात्र सुरळीत पुरवठा होत असून सुखसागरनगर परिसरावरच अन्याय का असा सवालही काही नागरिकांनी व्यक्त केला असून या स्थितीमध्ये सुधारणा व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. रात्री अपरात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने यापूर्वी चोऱ्या झाल्या आहेत.

**- विजय गायकवाड, आंबेगाव पठार**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५. Email : ambika.pune@gmail.com

छोटे अंग निराश का



जपानी पट्टीनुमा Vaccum Therapy
अंगाचा आकार आणि सेक्स पावरमध्ये वाढ शक्य
FDA चेसुद्धा मानने आहे की VACCUM THERAPY आणि आयुर्वेदिक औषधींद्वारा तुम्ही तुमच्या अंगाच्या आकारात वाढ करून सेक्स क्षमता वाढवू शकता. शीघ्रपतन, नपुंसकता, अंगाचा लहाणपणा, पातळपणा, वाकडेपणा दूर करुन सुडौल आणि मनासारखा सेक्स टाईम मिळवू शकता. ३० दिवसाच्या औषधीसोबत १६ जीबी मेमरी कार्ड मोफत.
NO SIDE EFFECT
09178726578
09090549912

# डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते रक्तपेढीचे उद्‌घाटन

**। पुणे : प्रतिनिधी**

'दीनानाथ मंगेशकर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल'च्या नवीन इमारतीमध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'रोटरी क्लब पुणे प्राइड रक्तपेढी'चे उद्‌घाटन ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते होणार आहे. हा समारंभ शुक्रवार, दिनांक ४ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता सौद बाहवान कक्ष, ८ वा मजला, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, एरंडवणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष कल्याण बॅनर्जी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, रोटरी ३१३१ चे प्रांतपाल सुबोध जोशी, मोहन पालेशा, डॉ. मंदा आमटे, पंडित हृदयनाथ मंगेशकर, रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

# जिल्ह्यात दोन हजार एचआयव्ही पॉझिटिव्ह रुग्ण

**। पुणे : प्रतिनिधी**

जिल्हा एड्स नियंत्रण विभागामार्फत दरवर्षी संशयित रुग्णांच्या रक्ताची तपासणी केली जाते. यामध्ये संपूर्ण पुणे जिल्ह्यात २१८२ एचआयव्ही पॉझिटिव्ह रुग्ण आढळले असल्याची माहिती पुढे आली आहे. एप्रिल २०१५ ते ऑक्टोबर २०१५ दरम्यान एकूण १,०५,८६७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी दोन हजार १८२ पॉझिटिव्ह रुग्ण आढळले असल्याचे निष्पन्न झाले आहे. या सर्व रुग्णांवर औंध येथील जिल्हा रुग्णालयाच्या एचआयव्ही समुपदेशन आणि चाचणी केंद्रांमध्ये (आयटीसीटी) उपचार सुरू असल्याची माहिती जिल्हा एड्स नियंत्रण अधिकारी कल्याणी पाटील यांनी दिली.

गेल्या काही वर्षांच्या तुलनेत एचआयव्हीबाधित रुग्णांमध्ये मोठी घट झाली आहे. वेळोवेळी करण्यात येणाऱ्या जनजागृतीचा हा परिणाम असल्याचे पाटील यांनी सांगितले. जिल्ह्यात सध्या ४४ आयटीसीटी (एचआयव्ही समुपदेशन आणि चाचणी) सेंटर आहेत. यामध्ये या रुग्णांना मोफत औषधे पुरविली जातात. या सर्व ठिकाणी वेळोवेळी समुपदेशन व जनजागृतीचे काम केले जाते. यामध्ये सर्वसामान्य रुग्णांसोबतच गर्भवती महिलांचीही एचआयव्ही तपासणी केली जाते. एप्रिल २०१५ ते ऑक्टोबर २०१५ दरम्यान एकूण ७४ हजार ७६६ गर्भवती महिलांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी १४६ गर्भवती महिला पॉझिटिव्ह आढळून आल्या आहेत. नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशनच्या (नॅको) माध्यमातून सन २००० पासून एचआयव्ही निर्मूलन मोहीम प्रभावीपणे राबवण्यास सुरुवात झाली. याअंतर्गत ४६,६५३ संशयित रुग्ण आढळून आले आहेत, तर ३०,४८३ पॉझिटिव्ह रुग्णांवर जिल्ह्यातील सर्व आयटीसीटीच्या माध्यमातून प्रभावी उपचार सुरू आहेत.

जिल्ह्यात सिव्हिल हॉस्पिटलबरोबरच विविध एनजीओंच्या माध्यमातून एचआयव्हीबाबत जनजागृती केली जात आहे. शिवाय जिल्हा एड्स नियंत्रण कार्यालयाच्या वतीने संशयित व पॉझिटिव्ह रुग्णांना औषधाबाबत माहिती देऊन त्यांना ही औषधे पुरविली जात आहेत. पूर्वीपेक्षा आता या रुग्णांची संख्या फारच कमी झाली आहे. या रुग्णांची प्रत्येक सहा महिन्याला रक्ततपासणी केली जाते. यामध्ये त्यांची प्रतिकारशक्ती तपासली जाते. त्यानुसार औषधांची मात्रा दिली जाते, असेही त्यांनी सांगितले.

### एचआयव्हीची लक्षणे

*एचआयव्ही झाल्यानंतर माणसाचे वजन कमी होत जाते. एचआयव्हीनंतर त्याचे रूपांतर एड्समध्ये होते. त्यानंतर त्याला सर्व प्रकारचे संसर्ग आजार होऊ शकतात. काहींमध्ये ट्यूमरची वाढही दिसून येते. नैसर्गिकरीत्या माणसाला शरीरात रोगप्रतिकारक यंत्रणा लाभलेली असते. एचआयव्ही आणि एड्सच्या विषाणूंची वैशिष्ट्य हे की, ते माणसाच्या रोगप्रतिकारक यंत्रणेवरच हल्ला चढवून ती नेस्तनाबूत करतात. यामुळे त्या व्यक्तीला अनेक आजार जडतात.*



### लागण होण्याची कारणे


*एचआयव्ही हा असुरक्षित शारीरिक संबंधातून, असुरक्षित व दूषित रक्तदानातून, योग्यप्रकारे निर्जंतुकीकरण न केलेल्या इंजेक्शनमधून, त्याचप्रमाणे आईकडून गर्भावस्थेत अर्भकाकडे संक्रमित होणारा आजार आहे. यासाठी सुरक्षित लैंगिक संबंध, काटेकोर दक्षता घेऊन घेतलेले इंजेक्शन व सर्व रक्तचाचण्यांनी हा आजार दूर ठेवता येतो.*

Proprietor Sunil Chandak Govt Reg.No.7342
+पेन केअर सेंटर+
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अ.नगर
खालील व्याधी (आजारावर) सल्ला व उपचार
सांधेवात, गुडघेदुखी
मान, पाठ, कंबरदुखी
मायग्रेन (डोकेदुखी)
फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी)
सायटीका, स्लिप डिस्क
टाचदुखी, टेनिस ऐल्बो
हातापायात मुंग्या येणे



पुणे - जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग (कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार सकाळी ८ ते ३ मो. 9420808990, 9403354523, 9822899660

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी सेक्स तज्ञांचा सल्ला व आयुर्वेदिक औषधी उपलब्ध



हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, शिथिलता, हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग,
मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
ॲझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला, डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.
7875451644, 8657122333
औषधीसाठी. संपर्क - 7769856821



आंबेगाव बु. येथील ग्रामपंचायतीमध्ये हवेली तालुका नागरी कृती समितीच्या वतीने महात्मा फुले यांची १२५ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष श्रीरंग चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.